MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2019
Issue-30, Vol-07

Date of Publication
30 May 2019

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

*विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली*
*नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले*
*वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले*

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

**Reg.No.U74120 MH2013 PTC 251205**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) अरुणा सबाने यांच्या कादंबरी लेखनातील स्त्रीविषयक जीवन जाणिवा
प्रा. करुणा व. डहाके, नागपूर. ||67

14) पेशवे कालीन सामाजिक चालीरितींचा अभ्यास : एक दृष्टीकोन
डॉ.दराडे संभाजी सोपानराव, अहमदनगर ||71

15) महाविदयालयीन विदयार्थी-विदयार्थीनींच्या स्व-संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास
डॉ.एन.डी.मांगोरे, कोल्हापूर ||77

16) गोर बोलीतील होळीगीते : आकलन आणि आस्वाद
श्री. बंडू बन्सी राठोड ||79

17) कल्याणमधिल स्थानिक पत्रकारीतेचा इतिहास
प्रा. पद्‌मजा वेरणेकर, कल्याण (प) ||81

18) बाल काहानियों में पर्यावरण
चेतना मंजू, हल्द्वानी ||85

19) रामायण में वर्णित पर्वतों का ऐतिहासिक एवं भौगोलिक अध्ययन
डॉ० श्याम प्रकाश & सत्य प्रकाश, लखनऊ ||88

20) समकालीन उपन्यास की यात्रा
दिवाकर विक्रम सिंह, झाँसी ||94

21) जख्म हमारे उपन्यास में दलित संघर्ष
डॉ. सुधीर गणेशराव वाघ, हिंगोली ||96

22) तीसरा हिस्सा : एक पड़ताल है — मध्यवर्गीय व्यक्ति की
डॉ० पंकज सिंह, लखनऊ ||100

23) भूमण्डलीकरण और नारीवाद का बदलता स्वरूप : एक समाजशास्त्रीय अध्ययन
डा० प्रगति आनन्द, बिहार ||104

24) भारत में कुपोषण की विकराल स्थिति : समस्या और समाधान
डा० दीपशिखा, मधेपुरा ||108

25) बिहार के राजनीति में महिलाओं की भागीदारी : एक ऐतिहासिक अध्ययन
पूजा कुमारी, बिहार ||112



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14

# पेशवे कालीन सामाजिक चालीरितींचा अभ्यास : एक दृष्टीकोन

डॉ. दराडे संभाजी सोपानराव
इतिहास विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई
ता. नेवासा जि. अहमदनगर

*********

**प्रस्तावना**

भारतीय समाजरचना विविध धर्मावर आणि जातीवर विभागलेला आहे. विविध प्रकारच्या मानवी समाजांनी स्वत:ची सांस्कशतिक वैशिष्ट्ये तयार केलेली पाहावयास मिळतात. प्रत्येक समाजाची जीवनपध्दती,आचार–विचार, रूढी व प्रथा, मुल्यव्यवस्था, पोषाख, विवाहपध्दती इत्यादीच्या संदर्भात विचार केल्यास एक समाज दुस–या समाजापेक्षा वेगळा दिसून येतो. मात्र त्यांच्यात जगण्याचा संघर्ष, गरजा आणि समस्या याबाबतीमध्ये जवळपास सारखेपणा असल्याचे जाणवते. व्यक्ती–व्यक्ती मध्ये सामाजिक संबंधाचे जे जाळे असते त्याला समाज ही संज्ञा उद्देशून वापरली जाते. भारतीय समाज विविध वर्णामध्ये विभागलेला पाहावयास मिळतो. तत्कालीन १८ व्या शतकातील समाजाचे अवलोकन केल्यास अनेक प्रकारच्या समस्या, उणिवा जाणवतात. भारतीय समाजात जागश्ती नसल्याने विविध प्रथा, रूढी, परंपरा निर्माण झाल्या होत्या. प्रत्येक समाजावर धर्माचे आणि जाती प्रथेचे कवच होते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा चार वर्णामध्ये समाज विभागलेला होता. या चार वर्णांची व शुद्रांची निर्मिती कशा प्रकारे झाली याविषयी कितीही अनुमान, तर्क काढले तरी सत्य काय आहे हे अवघड आहे. परंतु समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे आहे.

**पेशवे काळातील समाज रचना :**

समाज रचना म्हणजे समाजातील भिन्न भिन्न घटकांचे परस्पर संबंध होय. या सामाजिक घटकांनाच भारतात जाती–जमाती असे म्हटले जाते. मुळातच हिंदु समाज हा जातीवर आधारलेला होता. हिंदु समाजात व्यक्तींचा दर्जा हा तो कोणत्या जातीमध्ये जन्म झाला यावरच ठरत असतो. हिंदुची ओळख म्हणजे जातीची ओळख असे समीकरण म्हटले तर वावगे ठरणार नाही. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र व तत्सम जाती आणि अतिशुद्र किंवा अस्पृश्य जाती होत्या[१]

सर्वात 'वरची श्रेष्ठ जात म्हणून ब्राम्हणांचा उल्लेख केला जातो आजही कायदयाने सर्व समान असले तरी ब्राम्हणांना उच्च मानले जाते. मुंबई इलाख्याचे तत्कालीन गर्व्हनर सर रिपर्ड टेंपल आपल्या 'Oriental Experiences' या ग्रंथात पेशवे कुलाच्या कर्तबगारीबाबत म्हणतात., 'वंशशुध्दीसंबंधाने सूक्ष्म बंधने पाळणारी जात पृथ्वीवर ब्राम्हणाइतकी दुसरी नाही.[२] यावरून ब्राम्हणांचे महत्व व वर्चस्व समजते.तर भावे वा.कृ. म्हणतात, बीजशूध्दी व क्षेत्रशूध्दी ही जातीची आद्यतत्व होत, हिंदूत ज्यांना जात नाही असा समाजच नाही.[३] असे असले तरी हिंदुतील कितीतरी जाती पेशवेकाळामध्ये उदा. ब्राम्हण,मराठे व इतर सर्व जातींचे हिंदू लोक एकाच विचारसारणीत वाढले असल्यामुळे त्यांच्या वागणूकीची रित एकच होती. त्यांच्या देवभोळेपणाला मर्यादा नव्हत्या. जातीचा परंपरागत गोष्टींवर पूर्ण विश्वास होता. अंधश्रध्दा, रूढी, प्रथा,परंपरा इत्यादींनी तत्कालीन हिंदु समाजाच्या मनोरचनेचे स्पष्ट दर्शन घडते. हिंदु धर्मातील प्रत्येक जात ही जवळपास एका पंथासारखीच दिसते. हिंदु धर्म म्हणजे विविध जातींचे एक फेडरेशन वाटावे अशी परिस्थिती आहे.

समाजाची रचना जातीव्यवस्थेवर आधारित असल्याने, सरंजामशाहीचे स्वरूपही अस्तित्वात होते. १८व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजाचे

सरंजामशाही स्वरूपही तीव्रतेने लोकांच्या नजरेत भरत असे. समाजात उदयास आलेला सरदार, जहागिरदार, जमिनदार, सावकार इ.या वर्गाची उधळपट्टी, झगमगाट, त्यांच्या जेवणावळी, राजवाडे व कपडेलत्ते, सण–समारंभ व मिरवणुका हा जनतेच्या चर्चेचा विषय होत असे आणि आजही काही प्रमाणात याप्रमाणे घडल्यास चर्चा होते. त्याचबरोबर तत्कालीन समाजात असलेले भगतांचे अस्तित्व, बुवाबाजीचे स्तोम, साधू, स्वामी महाराजांचा असलेला सुळसुळाट हा अंधश्रध्दा आणि कर्मकांडाचाच भाग पेशवेकालीन समाजजीवनात अगदी ओतपोतपणे भरलेला होता असे दिसते.[४]

सामान्य गरीब जनता, समाजातील खालच्या (शूद्र) जाती अनेक देवदेवतांची उपासना करीत. दरदिवशी ते वेगवेगळया देवतेची पूजा करीत असत. त्यांच्या देव्हा–यात धातू, माती यांचे टाक, वाण, तांदळे, शाळीग्राम तसेच अनेक देव–देवतांच्या प्रतिमाही असत. कारण पेशवे कालीन समाजात, ''कनिष्ठ जातींना ब्राम्हण देवालयात प्रत्यक्ष आत जाऊन दर्शन घेता येत नसे. त्यांना जर दर्शन घ्यावयाचे असेल तर त्यांना मंदिराच्या बाहेरील प्रवेशद्वारापासून बाहेर उभे राहून दर्शन घेता येईल असा नियम होता.[५] हा नियम सर्व जाती पाळत असत कारण, ''मंदिराच्या बाहेर राहीन पण देवाचे दर्शन नक्कीच घेईन'' असा त्यांचा अट्टाहास, नव्हेतर धर्मभोळेपणा होता आणि या धर्मभोळेपणाची सजा आजही त्यांना काही प्रमाणात भोगावी लागत आहे. तरी देखिल या जाती आधुनिकतेची पाहिजे तितका अट्टाहास धरतांना मात्र दिसत नाहीत.

**विवाह :–**

विवाह हा एक संस्कार मानला जात असला तरी विवाहाचे विविध प्रकार होते. त्यापैकी बालविवाहाची प्रथा पेशवेकाळात सर्रास रूढ होती. मुलगी आठ वर्षांपुढे लग्नावाचून राहू देणे हा पेशवाईत अधर्म मानला जात होता. ''धर्माचरणासाठी स्त्री–पुरूष यांनी एकमेकांचा पती–पत्नी या नात्याचा केलेला अंगिकार म्हणजे विवाह''[६] निरनिराळया जातीची विवाह विधी वेगवेगळया प्रकारची होती. हळद व तेलवण आणि लाजाहोम अशी कश्त्ये सर्वच कनिष्ठ जातीत होत असत. सहसा ऋतूप्राप्त झाल्यावर लग्ने केली जात. मुलाचे लग्नाचे वय १२ ते १३ व मुलीचे वय ०८ ते ०९ वर्षाच्या आत केले जात. म्हणजेच मुलगी उपवर होण्यापूर्वीच अशा प्रकारचे विवाह होत असत. बालविवाहाची ही प्रथा सर्वच जातीत होती. पेशवे कालखंडात सतत युध्दे होत असल्याने कित्येक वेळा या बाल–वधूला अकाली वैधव्य प्राप्त होत असे. पती निधनानंतर तिला जिवंतपणीच नरकयातना भोगाव्या लागत असत.[७] बालविवाह हे पेशवेकालाचे खास वैशिष्टये होते.

बालविवाह बरोबरच विषम विवाह अस्तित्वात होते.ज्याला आपण जरठ विवाह म्हणतो ते या काळात प्रचलीत होते. विषम विवाह म्हणजे वर वधुपेक्षा अनेक पटीने वयाने मोठा असतो, लग्ने होण्यास अडचणी मोठया प्रमाणात होत्या. तरीही पेशवेकाळात बहुपत्नीला पध्दत अस्तित्वात होती.

सरकारी दरबारातील व्यक्ती, प्रतिष्ठित व्यक्ती, राजे, छत्रपती, पेशवे त्यांचे सरदार एकापेक्षा अनेक स्त्रियांशी लग्न करीत असत. इतकेच नाही तर पेशवेकालात सर्व जातीजमातीमध्ये अनेक लग्ने करण्याची प्रथा होती. विशेषत: सरंजामदारांत अशा प्रकारची अनेक लग्ने करण्याचा प्रघात होता. म्हणजे तत्कालीन गोरगरीब पुरूषांना हलाकीच्या परिस्थितीमुळे कोणी मुली द्यावयास तयार नसत, तर श्रीमंतांना मुली देतांना समामजातील लोक त्या व्यक्तीचे वय व त्याचा कितवा विवाह आहे हे काहीच पहात नसत. याशिवाय असुर, पिशाच्च व राक्षस विवाह ही अस्तीत्वात होते.

**हुंडा पध्दती :**

पेशवेकालीन विवाहात हुंडा पध्दतीही अस्तित्वात होती. आजही ही पध्दत भारतीय समाजातील बहुतांश जाती व धर्मात अस्तित्वात आहे, भलेही कायद्याने हुंडा देणे व घेणे हा गुन्हा मानला जात असला तरीही त्या काळात वरदक्षिणा म्हणून हुंडा दिला जात असे. काही वरपक्ष तर वधूच्या वडीलांकडून हुंडा घेत असत. अर्थात हे कनिष्ठ जाती व गरीब कुटूंबात घडत असे.[८]

**घटस्फोट :**

पेशवे काळात घटस्फोटाचे कोणतेही नियम नव्हते. विवाहीत पुरूष आपल्या पत्नीस क्षुल्लक कारणांवरून घटस्फोट देत असे. अशावेळी घटस्फोटीत स्त्रीच्या वाटयाला दुःख येई आणि समाजही तिच्याकडे तुच्छतेने पाहत असे. पेशवेकाळात काडीमोड (घटस्फोट) घेतल्याची अनेक उदाहरणे मिळतात. घटस्फोट घेण्याची कारणे वेगवेगळी होती.

विविध कारणांमुळे स्त्रियांवर वैधव्य आल्यावर विधवेने सर्व सुखाचा त्याग करून संन्यस्त जीवन जगावे असा संकेत होता. विधवांनी सार्वजनिक समारंभात जाऊ नये, कथा, प्रवचने, किर्तनामध्ये वेळ घालवावा अशी एक मनोवश्त्ती होती. विधवांच्या केशवपनाची (डोक्यांचे मुंडण) प्रथा प्रामुख्याने ब्राम्हण कुटूंबात होती. विधवेचे वपन मुंडण करून केस पतीच्या मश्त देहाबरोबर स्मशानात पाठविण्यात आले नसतील तर ब्राम्हण प्रेतास मंत्राग्नी देण्यास तयार होत नसत. त्यामुळे पतीनिधनाची वार्ता कळताच पत्नीचे मुंडण करण्यास येत असे.[९] मात्र काही जातीत प्रामुख्याने कनिष्ठ जातीत विधवांना पुनर्विवाहास परवानगी होती.

**सती प्रथा :—**

भारतात सती जाण्याचा सर्वात प्रथम उल्लेख ऐरण येथील अभिलेखात सापडतो. इ. सनाच्या दहाव्या शतकानंतर दक्षिण भारतात सती जाण्याची प्रथा रूढ झाली. ही पध्दत प्रथम क्षत्रिय स्त्रियांनी प्रचारात आणली. कालांतराने इतर जातीतही तिचा प्रसार झाला. म्हणूनच ब्राम्हणांपासून चांडाळंपर्यंतच्या सर्व जातीत सतीची प्रथा पहावयास मिळतात.

पेशवेकाळात सतीचा, स्त्रीच्या सहगमनाचा विधी समारंभपूर्वक पार पाडला जात असे. एखादी स्त्री सती जाण्यास सिध्द झाली तर गावांत तशी दवंडी पिटावी लागते, कारण सतीचे दर्शन लोकांना घ्यावयाचे असते. आणि नंतरच ती स्त्री समारंभपूर्वक चितेवर आणि पतिबरोबर सहगमन करते.[१०] अशी प्रथा होती. पतीबरोबर सती जाणे हा भारतीय नारीचा पतिव्रता धर्म आहे. ती हिंदू संस्कश्तीची सभ्यता आहे. सती गेल्यामुळे स्त्रीचा स्वर्गात सन्मान होतो. तिला मोक्ष मिळतो. असे खोटे तत्वज्ञान सांगुन स्त्रीयांना मोक्षाच्या मश्गजळामागे लावून ढोंगी ब्राम्हण पुरोहितांनी अनेक विधवांना सती जाण्यास भाग पाडले जात होते.[११]

पेशवेकाळात सती जाणा—या स्त्रियांचे प्रमाण फार मोठ होते. सर्वच्या सर्व बायका सती जात असत. त्याचबरोबर मालकाच्या मश्त्यूनंतर त्याच्या बरोबर असणा—या दासी, कलावंतिणी व रखेल्या अशा इतर स्त्रियाही सती जात होत्या. अशा या भयंकर व अमानुष सतीच्या प्रथेविरूध्द प्रथम राजाराम मोहन रॉय यांनी आवाज उठविण्याचे कार्य केले. लोकहितवदी, न्या.रानडे, महात्मा फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांनी मोठे कार्य केले. म्हणून १८२९ मध्ये ब्रिटिश सरकारने व १९५० मध्ये भारतीय संविधानाने ही सतीची प्रथा कायमची नष्ट केली आहे.

**नवस :**

एखादया इप्सिताचा ध्यास लागला असता जे लवकर साध्य व्हावे म्हणून एक प्रकारचा पण केला जातो. त्याला 'नवस' असे म्हणतात. नवसामध्ये पुत्रप्राप्तीसाठी केलेल्या नवसाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. आजारातून बरे होण्यासाठीही नवस केलेले आढळतात.साधारणतः संकटसूटका, इच्छीतकार्य सिध्दी, किल्ले जिंकण्यासाठीच पुत्रप्राप्तीसाठी नवस केला जात असे. इतकेच नव्हे तर रोग बरा होण्यासाठी कोणत्याही कारणासाठी स्त्रिया नवस करीत असत. तत्कालीन औषधशास्त्र आजच्या सारखे प्रगत नव्हते. त्यामूळे रोगमुक्ती किंवा रोग बरा होण्यासाठी साहजिकच लोक पुढील उपाय करीत. त्यामध्ये मांत्रिक—तांत्रिक, जप—तप, देवसेवा, नवस, अनुष्ठान, तुला, शतरूद्र, दान, प्रायश्चित, होम, शांती आणि तोडगा.इ[१२] चा समावेश होता. स्त्रियांबरोबर पुरूषही नवस करण्यामध्ये आघाडीवर होते.

**अनुष्ठाणे :**

अनुष्ठान म्हणजे एकप्रकारचे तप परमेश्वरास सुतूष्ठ करण्याचा हा साधा मार्ग होता. संकटकालात अशा प्रकारची अनुष्ठाने केली जात होती. याशिवाय

पाऊस पडावा म्हणून शत्रूचा युध्दात पराभव व्हावा म्हणून व पूत्रप्राप्ती व्हावी म्हणून ब्राम्हणांना अनुष्ठानास बसविण्याचा प्रघात होता. त्याचबरोबर देवाला संतुष्ट करून घेण्यासाठी व आपली इच्छा देवामार्फत पूर्ण व्हावी या हेतूने अनुष्ठाने केली जात होती. ज्या वेळेस छत्रपती, पेशवे, त्यांचे सरदार, सरंजामदार आजारी पडत असत त्या–त्या वेळेस आजारातून बरे होण्यासाठी महत्वाच्या धार्मिक ठिकाणी हे लोक अनुष्ठाने करवून घेत असे. तसेच रोगशांती, शांतिकर्म, ग्रहशांती, वास्तूशांती, होम, हवन, यज्ञ, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण इत्यादी अनुष्ठाने केली जात.[१४]

तत्कालीन लोक भित्रे नव्हते. संकटाशी झुंजणे व त्यातून मार्ग काढणे यामूळे प्रयत्नवादी बनले होते. तरी केवळ प्रयत्नाने साध्य होण्यास कठीण असे त्यांत यश येण्याकरीता देवतांची भक्ती करणे, अनुष्ठाने बसविणे, दान देणे, नवस लागणे, व्रत्ते पाळणे या उपयांचा ते अवलंब करीत. यावरून हे स्पष्ट होते की, एकतर ते अंधश्रध्दाळू, धर्मपराण, कर्मठ किंवा स्वत:वर विश्वास नसलेले लोक असले पाहिजेत. तसेच यावरून हे ही स्पष्ट होते की, 'ईश्वर तसा भुताखेतांवरही लोकांचा विश्वास होता.'[१५]

व्रते :–

दैवी आपत्तीतून सूटका करून घेण्यासाठी व्रतस्थ राहण्याची प्रथा होती. स्त्रिया व पुरूष दोघेही व्रते करीत असत. पेशवेकाळात पाळली जाणारी प्रमुख व्रते पुढील प्रमाणे होती त्यामध्ये संकष्टी चतुर्थी, गोकूळअष्टमी, संक्रांत, त्रिपुरी, शिवरात्र ऋषीपंचमी, रथसप्तमी, कोकिलव्रत, हरितालिका, सोळा सोमवार, संपत शुक्रवार, अनंतव्रत इत्यादीचा समावेश होता. तसेच दशाफलव्रत, बुध्दाष्टमीव्रत, त्रिपुरा पोर्णिमाव्रत, संकष्टी चतुर्थी व्रत, प्रतिपदाव्रत, व्दितीया व्रत, तृतीया व्रत, तिलकव्रत, मौनव्रत, तेलव्रत, वामन,व्दादशीव्रत, याशिवाय चार्तुमासात गरीब ब्राम्हणाच्या घरी पाणी घालणे, शिवनाम रांगोळी काढणे, वाती लावणे, तुलशी प्रदशिणांसह लाखेली घालणे ब्राम्हणाचे तीर्थ घेणे इ. व्रते ही केली जात[१६]

काशीयात्रा :–

पेशवेकाळात संपूर्ण देशात धामधूम अराजक असतानाही श्रध्दाळू लोक यात्रा करण्यास पवित्र मानीत होते. तत्कालीन काळात यात्रा करणे तितके सोपे नव्हते म्हणून समूहाने एकत्र येऊन यात्रा करावी लागत. आजच्या सारखी साधने तत्कालीन काळात नसल्याने कोणत्याही यात्रेला वेळ लागत असे. परंतु पवित्रयात्रा करणे हे हिंदुधर्मात मोठे कार्य मानले जाते. आजही हे प्रमाण काही कमी नाही. यात्रा करणे म्हणजे फक्त दर्शन करणे नव्हे तर तिर्थक्षेत्री श्राध्दे घालणे, संकल्प सोडणे, अयोध्या, मथुरा येथील रामकश्ण्ण यांची अवतार कार्ये जेथे घडली ती स्थळे पाहण्याच्या इच्छा स्वाभाविकपणे होत असायची.[१७] 'यामुळे यात्रा करणे म्हणजे जवळपास सहा महिन्याचा उदयोग होऊन बसत असे.

काशी हे हिंदूचे अत्यंत पवित्र असे स्थळ मानले गेले आहे. आयुष्यात जर मोक्ष प्राप्ती मिळवायची असेल तर तो काशीला गेल्याशिवाय मिळू शकत नाही अशी हिंदूची धारणा होती आणि ती आजही आहे. त्यामूळे आयुष्यात एकदातरी काशीस जाणे म्हणजे काशीयात्रा करणे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य ठरत असे. काशीयात्रेप्रमाणे धार्मिक बाबतीत पवित्र जलाला अत्यंत महत्व होते. त्यातल्यात्यात गंगानदीच्या जलाला प्राचीन पवित्र मानले गेले होते. एकंदरीत यावरून असे चित्र स्पष्ट होते की, पेशवेकाळात व्रतांचा फारच सुळसुळाट झाला होता आणि महिण्यातला प्रत्येक दिवशी किमान एक तरी व्रत धारण करण्यात स्त्रीया गुंतलेल्या असे.

**प्रायश्चित :–**

नितीबाहय वर्तन झाल्यास किंवा हातून कळत न कळत पाप झाल्यास प्रायश्चित घ्यावे लागत असे.[१८] कारण हिंदू धर्नशास्त्रीय परंपरेप्रमाणे ब्रम्हहत्या, शिशूहत्या, सुरापान, सुवर्णचोरी, गुरूस्थ गमन ही पातळे सर्वत्र निशिध्द मानली जात असत.

त्याचप्रमाणे पंक्तिदेष, पशुहत्या, गोहत्या, मनुष्य हत्या, भुताळेपणा, भ्रष्टजन संसर्ग, बदकर्म इ. साठीही प्रायश्चित घ्यावे लागत असे.

भूतबाधा :—

मध्ययुगीन समाजरचनेत भूतबाधा, लागीर, चेटूक इत्यादी निन्याचे प्रकार होते. खेडया—पाडयातून हा प्रकार केला जात असे. भूतबाधा व अंगावर भूते घालण्याचे प्रकार देशापेक्षा कोकणात अधिक होते. भुताखेताप्रमाणेच समाजात चेटकांचे वर्चस्व होते. खेडयापाडयातून याला भानामती म्हटले जात होते. जारण—मारण ही यासारखीच एक विद्या होती. शत्रूला मारण्यासाठी या विदयेचा उपयोग केला जात असे.[१९] म्हणजे या काळात काय—काय आणि किती भ्रामक कल्पना अस्तित्वात होत्या आणि विशेष म्हणजे लोक यालाच धर्म समजत असत. जसा देवावर तसा भूताखेतांवरही लोकांचा विश्वास होता आणि भूताची भीती भटभिक्षूकांना जास्त वाटत होती

ग्रहणे :—

पेशवेकाळात सर्वसामान्य लोकांना ग्रहणांचे फार मोठे संकट वाटत होते आणि त्याचे अनिष्ठ परिणाम आपणावर किंवा आपल्या कुटूंबावर होऊ नयेत अशी प्रत्येकाची धडपड होती. ग्रहणापुर्वी आणि नंतरचे चार दिवस कोणत्याही चांगल्या कार्याला विशेषतः प्रवास वर्ज्य मानला जात असे. ग्रहणाच्या पर्वकाळात मोठया प्रमाणात दानधर्म करण्याची प्रथा होती. ग्रहपीडा किंवा ग्रहदशा मंत्र, तंत्र, व्रत, उद्यापन, अनुष्ठान आदींनी कमी करता येते असा दश्ढ विश्वास सामान्य वर्गांचा होता. यामध्ये कोणत्या ग्रहणे कोणते स्थान व्यापले आहे यावर त्या व्यक्तिचे यशापयश अवलंबून असते असा समज होता. नीच स्थानात असणारे ग्रह पीडाकारक आणि उच्चस्थानी असणारे ग्रह लाभदायक असे मानले जात होते यालाच ग्रहपीडा असेही म्हणतात.[२०] ग्रहणे आणि ग्रहपीडा बाबत आजही काही कर्मकांडप्रेमी लोक हे नियम काटकोरपणे पाळतात. विशेषतः गर्भवती स्त्रीय ग्रहणाच्या काळात घराबाहेर पडू दिल्या जात नसे. कारण ती घराबाहेर पडल्यास गर्भावरती विपरीत परिणाम पडतो किंवा विकश्ती निर्माण होते अशी त्यांची धारणा होती. परंतु यास कोणताही शास्त्रीय आधार नाही. म्हणजेच पेशवेकाळातील मानसिकता आजही अस्तित्वात आहे असेच म्हणावे लागेल.

शांतीकर्म :—

मुलाचा जन्म झाल्यावर त्याची कुंडली पाहिली जात असे आणि ग्रह अरिष्ट असल्यास ग्रहशांती केली जात असे. व्यक्तिप्रमाणेच वास्तू, उदक आदींना ग्रहाची पीडा लागू शकते म्हणून वास्तूशांती, उदकशांती इ. प्रकारचे विधी केले जात होते. नजर लागणे हे या प्रकारातच समजले जात होते. याशिवाय व्रते—दाने, अनुष्ठान व तुला केल्याने ईश्वराचा व ग्रहदिकांचा कोप नाहीसा होऊन आलेली संकटे टळतात अशी त्यांची धारणा होती. वेगवेगळया संकटावर वेगवेगळे मंत्र असून त्यांची माहिती ब्राम्हणांना चांगली होती. साधारणपणे रोगांपासून, आजारापासून किंवा दुखण्यापासून सूटका होण्यासाठी शांती केली जात असे, घर तयार झाल्यावर वास्तुशांती तर आपल्या स्त्रीस ऋतू प्राप्त झाला म्हणून ऋतूशांती केल्याचेही उदाहरण आहे.[२१]

आजच्या घडीला रोग, आजार, दुखणे आणि ऋतूशांती या प्रथा काही प्रमाणात अस्तित्वात असल्या तरी वास्तुशांतीने समाजात स्तोमच माजविले आहे. कारण जितके मोठे घर तितकामोठा वास्तूशांतीचा कार्यक्रम आयोजित केला जात असल्याचे दिसते इतकेच नव्हे तर यातून आपल्या बडेजाव व श्रीमंतीचे दर्शन घडविल्या जात असे.

मुहूर्त :—

पेशवेकाळातील समाजात कोणत्याही छोटया—मोठया गोष्टीसाठी मुहूर्त पाहणे हे पेशवेकालाचे खास वैशिष्टे होते. मुहूर्त पाहून देणे हा जोशी वर्गाचा प्रमुख व्यवसाय होता. मुहूर्ताचे दोन प्रकारः शुभ मुहूर्त व कुमूहूर्त समाजात होते. याकाळात मुहूताची गरज पावलो—पावली लागत होती. घरून परगावास जाण्यास मुहूर्त व परगावाहून घरी येण्यास मुहूर्त पाहिले जात होते तेव्हा असे वाटते की तत्कालीन लोक अज्ञानामुळे बरेच भोळे होते. त्यांच्या बुध्दीत चिकित्सकपणा फार कमी होता. एखादी गोष्ट कळली असता तिच्या शक्याशक्यतेचा विचार न करता ते त्यावर विश्वास

ठवीत असे.

या चालीरीती बरोबरच जन्मोत्सव, गर्भाधान, जातकर्म, नामकरण, अन्नप्राशन, जावळ काढणे, व्रतबंध, मुंज किंवा उपनयन, लग्न समारंभ, देवकस्थापणा, नवरीची उष्टी हळद, आहेर समारंभ, श्रीमंत पुजन, देकार, तेलकव, रूखवत इत्यादी प्रचलीत होते.[२२]

**समारोप :—**

पेशवेकाळातील समाज, जाती व उपजाती यामध्ये विभागला गेलेला होता. त्या—त्या जातीचे व उपजातीचे स्वत:चे असे आचार व विचार, रूढी व परंपरा व अंधश्रध्दा यांना स्थूलमानाने त्या—त्या समाजातील आचार असे म्हटले जाते. ज्यांना धर्मशास्त्रीय आधार असतो. अशा सामाजिक व धार्मिक चालीरीतींचे पालन पोषण करण्यास समाज पुढे असतो. सातारचे छत्रपती, सेनापती, सरदार, सरंजामदार आणि सामान्य वर्ग हे ही या चालीरितीचे पालन काटेकोरपणे करण्यात सहभागी होते.

पेशवेकाळातील चालीरीती व आजच्या काळातील चालीरीतींचा तुलनात्मक अभ्यास केल्यास बहुतांशी प्रथा आजही काही अंशी प्रमाणात दिसून येतात. २१ व्या शतकात विज्ञानाची व मानवतेच्या सभ्यतेची प्रगती असली तरी या प्रथा आढळून येतात. प्रत्येकाला एकमेकांनी समजून घेतले आणि वस्तूस्थितीचे अवलोकन केल्यास प्रगल्भ समाजाची जडणघडण होवून राष्ट्रीय एकात्मता साधली जावू शकते.

**संदर्भ साधने :**

१. गवळी पी. ए., पेशवेकालीन समाज व जातीय संघर्ष, प्रचार प्रकाशन, कोल्हापुर , १९८२
२. कित्ता.
३. प्रमोद ओक, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ३री आवृत्ती, २००१
४.उपरोक्त, गवळी पी.ए. (१९८२)
५. पांगारकर ल.रा. (संपा:अनुवाद), श्री समर्थ दासबोध, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९८६
६. उपरोक्त, गवळी पी.ए. (१९८२)
७. कुलकर्णी अ.रा. खरे (संपा), मराठ्यांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल पब्लिकेशन, पुणे, १९८४
८. कित्ता
९. कित्ता
१०. कुलकर्णी अ.रा, पुण्याचे पेशवे, राजहंस प्रकाशन, पुणे २००४
११. राजस वसंत, स्त्रियांचे उध्दारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आनंद प्रकाशन, औरंगाबाद २००५
१२.देशमुख शरद, शिवकाळातील व पेशवाईतील स्त्री जीवन,कॉन्टीन्टेक प्रकाशन, पुणे, १९८८
१३.उपरोक्त, गवळी पी.ए
१४.भावे. वा.कृ., पेशवे कालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, १९७६
१५.कित्ता
१६.उपरोक्त, गवळी पी.ए.
१७.उपरोक्त, भावे वा.कृ.
१८.गवळी पी.ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८३.
१९.उपरोक्त, भावे. वा.कृ.
२०.कित्ता.
२१.उपरोक्त, गवळी पी.ए.
२२.उपरोक्त, गवळी पी.ए.

❑❑❑